International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.065
Vol.8 No.2 Nov -Dec 2020

# मराठी आख्यायिका संशोधन स्वरुप व दिशा

**प्रा.वंदना पाटील**
कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं.), ता.कन्नड,
जि.औरंगाबाद.
ईमेल vandanawani74@gmail.com

## सारांश

मराठीत लोकसाहित्य हा शब्द Folklore या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि त्या संबंधीचे लेखन १९८५ पासून सुरु झाले. १९२० साली कै.वि.का.राजवाडे यांनी लोकगीत, लोककथा हे पारिभाषिक शब्द वापरले होते. द. वा. पोतदार यांनी इंग्रजीतील Folklore चे भाषांतर म्हणून 'लोकविद्या' हा शब्द वापरला. पुढे यासाठी 'लोकवाङ्मय' हा शब्द वापरण्यात येऊ लागला. नंतरच्या काळात लोकसाहित्य हा शब्द वापरण्याचा परिपाठ सुरु झाला. लोकयान, लोकसंस्कृती, लोकवार्ता हे पर्यायी शब्दही वापरले जातात.

लोकसाहित्याची परंपरा आदिमानव काळापासूनची आहे. हजारो वर्षापूर्वीची ही परंपरा बदलत्या काळाप्रमाणे, त्या त्या काळातील बदलत्या जीवनाचे संदर्भ घेत घेत आजपर्यंत येऊन पोहोचलेली आहे. कित्येक शतकांपासून लोकजीवनात अखंडपणे प्रवाहित राहिलेला लोकसाहित्याचा हा प्रवाह आता खंडित होतांना दिसतो आहे. लोकसाहित्याला निरनिराळ्या काळातील ज्ञानशाखांच्या अभ्यासात अभ्यासाची सामग्री म्हणून लोकसाहित्याला विशेष महत्व आहे. पारंपारिक लोकजीवनाचे नितळ प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले पहावयास मिळते. लोक मनातील विविध भावभावनांचा अविष्कार त्यातून झालेला असतो. लोकमाणसाचा अविष्कार ज्या विविध माध्यमातून होतो त्या सर्वांचा समावेश लोकसाहित्यातच करता येतो.

लोकसाहित्य ही व्यापक संज्ञा आहे. लोकसाहित्यास लोक विश्वास, लोकश्रध्दा, लोकसमजूती, लोकभ्रम, लोकनिधी, रुढी—प्रथा, लोकाचार, लोककला, भौतिक संस्कृती आणि मौखिक रुपातील शब्दाविस्कार, लोकवाङ्मय इत्यादी बाबींचा समावेश होतो. लोकसाहित्यातील मौखिक रुपातील शब्दाविष्कार म्हणजेच मौखिक वाङ्मयात

लोकगीते, लोककथा, लोककथागीते, उखाणे, म्हणी व वाक्संप्रदाय यांचा समावेश होतो.

लोकसाहित्यातील काही महत्वपूर्ण बाबींचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

१) लोकविश्वास, लोकश्रध्दा, लोकसमजूती, लोकभ्रम, लोकोक्ती.

२) आचार—विचार, रितीरिवाज, रुढी, प्रथा.

३) विधी—विधाने, सण, उत्सव, व्रत—वैकल्ये.

४) निसर्गातील दैवी शक्तींचे स्पष्टीकरण.

५) निसर्गातील दृश्यांचे, घटनांचे लावलेले अर्थ.

६) पारंपारिक व्यवसाय व कौशल्ये.

७) परंपरेशी नाते सांगणाऱ्या वस्तु व वास्तू.

८) यंत्र, मंत्र, तोडगे, जादुटोणा.

९) वनस्पती, नक्षत्रे, खनिज, प्राणी इत्यादी विषयींचे लोकांना असलेले ज्ञान.

१०) लोकनृत्य, लोकनाट्य, लोककला इत्यादी कला.

११) मनोरंजनाचे, खेळाचे प्रकार.

१२) लोककथा, लोककथागीते, लोकगीते, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी कलात्मक शब्दाविष्कार स्थूलमानाने वरील बाबींचा समावेश लोकसाहित्यात करण्यात येतो.

लोकसाहित्याची ही व्याप्ती लक्षात लोकसाहित्यातील अनेक सुक्ष्मातिसुक्ष्म बाबींच्या आधारे संशोधनकर्त्यास संशोधन करता येऊ शकते. तसेच अनेक विषयाच्या अभ्यासाची सामुग्री सामाजिकशास्त्रे यांचा आधार घेऊन संशोधनास वाव आहे.

**लोककथा :—**

मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित असलेल्या कथा म्हणजे लोककथा. जगभरच्या लोकवाङ्मयात लोककथा विपूल प्रमाणत उपलब्ध झालेल्या आहेत. लोककथांना प्राचीन काळापासून महत्वाचे स्थान मिळालेले आहे.

मराठी उपलब्ध लोककथांच्या स्वरुपाच्या आधारे, त्यातील आशयाप्रमाणे तसेच लोककथांचा निर्मिती, उद्देश, रचना आणि त्यातील कथाविशेषांच्या अनुषंगाने लोककथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१) दैवतकथा

२) अद्‌भुत कथा

३) दंतकथा—आख्यायिका

४) नीतिकथा

५) वीरकथा

६) हास्यकथा

७) व्रतवैकल्याच्या कथा

या वर्गीकरणाच्या अनुषंगाने प्रत्येक प्रकारच्या दिशेनेही संशोधन करता येऊ शकते.

**आख्यायिका :—** लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली कथा जी एखाद्या ऐतिहासिक घटनेवर आधारित असते. पण मौखिक परंपरेत या कथेचे स्वरुप संपूर्णत:

बदललेले असते तिला आख्यायिका किंवा दंतकथा म्हणतात. या दंतकथा म्हणजे ऐतिहासिक आख्यायिका असतात. त्याचा गाभा सत्य सृष्टीतील असतो. काही आख्यायिकांना पौराणिक कथेचे किंवा दैवत कथेचे स्वरुप प्राप्त झालेले असले तरी त्याच्या मुळाशी केव्हाचे तरी ऐतिहासिक सत्य दडलेले असते. ऐतिहासिक व्यक्ती किंवा घटना यांच्यासंबंधी आख्यायिकांचे संशोधन आख्यायिकांमध्ये ऐतिहासिक व्यक्ती किंवा त्यांच्याशी संबंधित आख्यायिकांचा शोध घेवून संशोधन करता येऊ शकते. उदाहरण म्हणजे एखादा वाडा कोणी बांधला, मंदीर कोणी बांधले याचा शोध घेऊन संशोधन करावयास भरपूर वाव आहे. समाजामध्ये होऊन गेलेल्या श्रेष्ठ विभूतीविषयी जनमाणसात गुढ आकर्षण निर्माण होते. त्याने समाज मानस भारावले जाते. अशा भारावलेल्या मन:स्थितीतून आणि त्याच्या विषयीच्या गुढ आकर्षणातून त्याच्या जीवन चरित्राविषयी तसेच त्यांच्या जीवनात घडलेल्या घटनांवर आधारित आख्यायिका निर्माण होतात. लोकप्रतिमा निर्मित या कथा मौखिक परंपरेने प्रचलित असतात. अशा स्वरुपात कथांत कल्पना संबंधीची पुनरावृत्ती होत असते. या कल्पनासंबंधी सूची करुन या आख्यायिकांचा शोध घेणे ही उद्‌बोधक होईल.

**स्थळांसंबंधीच्या आख्यायिकांचे संशोधन :—**

तीर्थक्षेत्रे, नदी, डोंगर, देवस्थाने इत्यादी संबंधीच्या आख्यायिकाही मराठीत उपलब्ध आहेत. स्थानिक आख्यायिका गावोगाव ऐकावयास मिळतात. औंढानागची आख्यायिका, भूताचा वाडा, पडक्या वाड्याची आख्यायिका, चिंचेच्या झाडाची आख्यायिका अशी काही उदाहरणे देता येतील. अशा अनेक स्थळांसंबंधीच्या आख्यायिकांचे संकलन करुन त्याची सूची बनवून संशोधन करण्यास भरपूर वाव आहे.

**पुरलेल्या धनासंबंधीच्या आख्यायिकांचे संशोधन :—** गुप्ततेचीआख्यायिका, तांब्यांच्या हंड्यात धन पुरणे, पुरलेल्या धनावर भुजंगाचे राखण, धनप्राप्तीसाठी बळी इत्यादी

पुरलेल्या धनासंबंधीच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. आख्यायिकांच्या या अंगानेही संशोधन करता येणे शक्य आहे.

**वास्तु घडवणे, वस्तू, भूत—पिशाच्च यांच्या संबंधित आख्यायिका :—**

वास्तू, घरे, झाडे यांच्याशी भूतखेते, पूर्वज यांचा संबंध जोडून काही आख्यायिका रुढ होतात. अशा आख्यायिकांना स्थानिक आख्यायिका असे म्हणतात. या आख्यायिकांमधून काही कल्पनाबंधही समोर येतांना दिसतात. त्यापैकी भूताचा वाडा, अमावस्येच्या रात्री भूत दिसणे, भूत लागणे, श्रीमंतपण, चिकू सावकार, तांब्यांच्या मोठ्या हंड्यात धन पुरुन ठेवणे, पुरलेल्या धनावर भुजंगाचे राखण, धनप्राप्तीसाठी बळी, रात्री स्वप्नात धन दिसणे, पुरलेले धन काढतांना मृत्यू, वंश बुडणे, भक्तासाठी देव स्वतःची जागा बदलतो, पाप धुणारी नदी इत्यादी कल्पनाबंध आपणास आख्यायिकेतून ऐकावयास मिळतात. या कल्पनाबंधाच्या अंगानेही संशोधन करता येणे शक्य आहे.

काही आख्यायिका या कोणत्याही स्थानाशी संबंधित नसतात. त्यांचा प्रसार प्रदेशाच्या आणि भाषा भेदाच्या सीमा ओलांडून होतो. अशा आख्यायिकांचे संकलन करुनही संशोधन करता येते.

**पौराणिक व धार्मिक स्वरुपाच्या आख्यायिका :—**

या आख्यायिका धर्मश्रध्देतून निर्माण झालेल्या असतात. त्यांना पौराणिक व धार्मिक संदर्भ लाभलेले असतात. म्हणून अशा आख्यायिकांचे पौराणिक व धार्मिकतेच्या दिशेनेही संशोधन करता येणे शक्य आहे.

**स्वरुप व रचना तंत्र :—**

आख्यायिकांचा आकार ठरलेला नसतो. ठराविक असे रचना तंत्रही नसते. आशय मात्र ठरलेला असतो. आशय परत्वे कथेचे स्वरुप बदलत जाते. आख्यायिका

आरंभ व शेवट याविषयीही काही संकेत नसतात. ती आकस्मिकपणे सुरु होते व अकस्मात थांबते. आख्यायिकाच्या स्वरुप व रचना तंत्राच्या दृष्टीनेही संशोधन करता येते.

**समारोप :—**

लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या लोकमानसाच्या कृती—उक्तींचा समावेश लोकसाहित्यात होतो. समाजातील वेगवेगळ्या जाती—जमातीत अनेक रुढी, प्रथा, लोकभ्रम, लोकसमजुती लोकमानसावर प्रभाव गाजवितांना दिसतात. अशा लोकसमजुतींच्या मुळाशी असलेल्या विचारांचा शोध या लोक समजुतींच्या आधारे घेता येवू शकतो.

लोककथांमध्ये आख्यायिकेसही महत्वपूर्ण स्थान आहे. या आख्यायिकांत ऐतिहासिक व्यक्ती किंवा घटनांसंबंधी आख्यायिका, स्थळ काळासंबंधीच्या आख्यायिका, पुरलेल्या धनासंबंधीच्या आख्यायिका, वास्तू, घराणे, वस्तू, भूत, पिशाच्च यांच्या संबंधित आख्यायिका, पौराणिक व धार्मिक स्वरुपाच्या आख्यायिका, आख्यायिकांचे स्वरुप व रचना तंत्र या सर्व अंगाने आख्यायिकांचे संशोधन करण्यास आज भरपूर वाव आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) लोकसाहित्य संकल्पना व स्वरुप — डॉ.शरद व्यवहारे.

२) लोकसाहित्याचे स्वरुप — प्रभाकर मांडे

३) लोककथा — डॉ.सरोजिनी बाबर